Vol 6 Issue 8 Sept 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2230-7850

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor :4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 8 | September - 2016

Indian Streams Research Journal

# “मुस्लीम मराठी साहित्य संकल्पना : उदय आणि विकास”

*प्रा. डॉ. शकील शेख*
*प्रमुख, मराठी विभाग, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर.*

## प्रास्ताविक :–

सन १९६० नंतर म्हणजेच साठोत्तरी मराठी साहित्यात अनेक नवीन नवीन प्रवाह उदयास आले. या नवीन प्रवाहातील एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे मुस्लीम मराठी साहित्य होय. मुस्लीम मराठी साहित्य हे १९८०–१९९० च्या कालखंडात मोठ्याा प्रमाणात लिहिले गेले. त्यामुळे मुस्लीम मराठी साहित्याची निर्मिती ही अलीकडच्या कालखंडातील मानली जाते. पण दहाव्या–अकराव्या शतकापासून मुस्लीम मराठी साहित्याची निर्मिती होत होती. साधारणपणे १०५० ते १८५० या कालखंडात संत आलमखान, संत मुंतोजी बामणी, संत मुर्तुजा कादरी, संत लाडले मशाक अशा ४९ मुस्लीम मराठी संतकविंनी मराठीतून लेखन केले. संत वाङ्मयाबरोबरच शाहीरी वाङ्मयातही मुस्लीम शाहिरांनी आपला ठसा उमटवला. सोळाव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंत अनेक मुस्लीम शाहिरांनी शाहिर म्हणून नावलौकिक मिळवला. शाहिर अब्दुल, शाहिर अबालाल, शाहिर सगनभाऊ, शाहिर लहरी हैदर, शाहिर अमर शेख यासारखे अनेक नामवंत शाहिर या कालखंडात होऊन गेले. मुस्लीम संत कवी, शाहिर मराठीतून लिहित होते पण त्यांच्या लेखनात त्यांच्या मुस्लीम नावाशिवाय कुठेच ‘मुस्लीमपणा’ येत नव्हता. मुस्लीमांचे जीवन जगणे, त्यांच्या व्यथा, वेदना, सुख–दुःख, त्यांचे भावविश्व, त्यांच्या जाणिवा–नेणिवा या कविंच्या साहित्यातून येत नव्हत्या. त्यामुळे या संतकविंचे साहित्य मुस्लीम मराठी साहित्य म्हणून उदयास आले नाही.



मुस्लीम मराठी साहित्यिकांच्या लेखनात मुस्लीम जाणीवा याव्यात, ही अपेक्षा रास्त होती. या अपेक्षेतूनच १९३५ साली सांगलीच्या सय्यद अमीन यांनी ‘मुस्लीम मराठी साहित्य’ ही संकल्पना मांडली आणि त्यांनी याच नावाने एक साप्ताहिक सुरू केले. सय्यद अमीन यांनी मराठी भाषेतून एकूण १७ पुस्तके लिहिली. मराठी भाषेतील दर्जेदार लेखनशैली असलेली ही पुस्तके होत.

१९६० नंतर शिक्षण प्रसारामुळे हळुहळू मुस्लीम तरूण वर्ग शिकून पुढे येऊ लागला, तेव्हा त्याला जाणिव झाली की आपल्या व्यथा वेदनांची दखल मराठी साहित्याने घेतलेलीच नाही. उलट मराठी साहित्यातून जे मुस्लीमांचे चित्रण आलेले आहे ते सर्व एकांगी व विकृत स्वरूपाचे आहे. मराठी साहित्यातून आलेला हा मुस्लीम वास्तव मुस्लीमांपेक्षा खूपच भिन्न स्वरूपाचा होता. मराठी साहित्यात मुस्लीमांचे जे चित्रण आले होते ते कपोलकल्पित अशा स्वरूपाचे होते. मराठी साहित्यातून आलेला हा मुस्लीम खूनी, बलात्कारी, जमातवादी, माथेफिरू आणि गुन्हेगारी वृत्तीचा दाखवण्यात येत होता. उदा. :– ह. ना. आपटे यांच्या ‘चंद्रगुप्त’, ‘वज्राघात’, ‘केवळ स्वराज्यासाठी’, ‘भयंकर दिव्य’ इत्यादी कादंबऱ्यामधून, श्री. ना. पेंडसे यांच्या ‘एल्गार’ या कादंबरीतून, पु. भा. भावे यांच्या ‘सतरावे वर्ष’, ‘हिमानी’ या सारख्या कथासंग्रहामधून मुस्लीमांचे विकृत चित्रण येते. या शिवाय मुस्लीम म्हणजे विलासी, चैनी, जुगारी, दारूडे असेही चित्रण मराठी साहित्यातून आलेले दिसते. मराठी साहित्यातून आलेले हे चित्रण एकांगी स्वरूपाचे होते. मुस्लीमांचे दुःख, त्यांचे प्रश्न, त्यांच्या व्यथा–वेदना, त्यांची जगण्याची पध्दती, त्यांच्या चालीरिती, त्यांच्या श्रध्दा–अंधश्रध्दा, त्यांच्या भाव–भावना मराठी साहित्यात कुठेच दिसत नव्हता. अशा स्थितीत १९७० साली महात्मा फुले यांच्या वैचारिक प्रेरणेने त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून हमीद दलवाई यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. त्यांनी मराठी भाषेचा आग्रह धरून मेळावे, परिषदा घेतल्या. ‘इंधन’ सारखी कादंबरी लिहून मुस्लीमांच्या समस्यांना तोंड फोडले. पण हमीद दलवाईंच्या चळवळीने हिंदू धर्म सुधारणा आणि मुस्लीम प्रबोधन यातील एक चुकीचे समांतर साधर्म्य शोधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांची चळवळ पकड घेऊ शकली नाही.

१९६० च्या कालखंडात भारतातील सामाजिक, राजकीय परिस्थिती बदलत गेली. आतापर्यंत असणारा सामाजिक, धार्मिक सलोखा हळुहळू

संपुष्टात येऊ लागला. महाराष्ट्रात शहरापासून खेड्यापर्यंत सामाजिक, धार्मिक वातावरण बदलत गेले. मराठी मुसलमान हा गेल्या कित्येक शतकापासून महाराष्ट्रात राहतो आहे, त्याचा जन्म महाराष्ट्रातलाच किंबहुना महाराष्ट्रातील ९९ः मुस्लीम समाज हा इथल्या चातुर्वर्ण्याच्या अन्यायकारक चौकटीतून सुटण्यासाठी धर्मांतरित झालेला मूळचा मराठमोळा माणूसच आहे. तो मराठी प्रादेशिक प्रवाहाचा अविभाज्य घटक आहे. परिणामी तो राष्ट्रीय प्रवाहाचा नैसर्गिक घटक आहे. मराठी असणे, मराठीतून लिहिणे हा महाराष्ट्रीयन मुसलमानांचा नैसर्गिक व्यवहार आहे. असे असताना गुण्या-गोविंदाने राहणाऱ्या ग्रामीण मुसलमानांना जमातवादाचा फटका बसू लागला. मुस्लीमांकडे संशयाच्या नजरेने पाहिले जाऊ लागले. त्यांना परकीय ठरवले जाऊ लागले, औरंगजेबाची औलाद म्हणून हिणवले जाऊ लागले. फाळणीसाठी त्याला जबाबदार ठरवले जाऊ लागले. अशा स्थितीत येथील मुस्लीमांसमोर अनेक प्रश्न उभे राहिले, त्यातला एक मूलभूत प्रश्न म्हणजे 'मी कोण ?' हा होता या 'मी कोण ?' मधूनच मुस्लीम मराठी साहित्याची निर्मिती झाली.

मुस्लीम मराठी साहित्याची संज्ञा १९३६ च्या सुमारास सय्यद अमीन यांनी जरी उपयोगात आणली असली तरी त्यानंतर जवळ जवळ ४० वर्षे त्याचा विशेष वापर झाला नाही. कारण या कालखंडात विशेष साहित्य निर्मिती झाली नाही. पण ४० वर्षानंतर पुन्हा या संज्ञाविषयी चर्चा होऊ लागली. कारण शिक्षणाच्या प्रचार, प्रसारामुळे शिकून पुढे आलेले मुस्लीम मराठी साहित्यिक, बदलत्या सामाजिक, राजकीय परिस्थितीमुळे जे प्रश्न निर्माण झाले त्यावर भाष्य करू लागले. आपले, आपल्या कुटुंबाचे, आपल्या समाजाचे प्रश्न साहित्याच्या माध्यमातून मांडू लागले. यातूनच मुस्लीम मराठी साहित्य चळवळ उदयास आली.

'मुस्लीम मराठी साहित्य' कशाला म्हणावे हे समजून घेण्यासाठी मुस्लीम मराठी साहित्याची व्याख्या पाहणे गरजेचे ठरते. अनेक मुस्लीम विचारवंतांनी मुस्लीम मराठी साहित्याच्या व्याख्या केल्या आहेत. प्रा. फ. म. शहाजिंदे यांच्या मते, "मुस्लीम समाज जीवनाचे चित्रण ज्या मराठी भाषिक मुस्लीम लेखकाने आपल्या मानसिकतेसह केलेले आहे, त्याला मुस्लीम मराठी साहित्य असे म्हणावयास हरकत नाही"[१] मुस्लीम मराठी साहित्यात मुस्लीम समाजजीवन आणि मुस्लीम मानसिकता या दोन गोष्टी येणे क्रमप्राप्त आहे. मुस्लीम समाजजीवन आणि मुस्लीम मानसिकता ज्या लेखनात नाही अशा लेखनाचा लेखक मुस्लीम असला तरी त्याला मुस्लीम मराठी साहित्य म्हणता येणार नाही. फक्त मुस्लीम जातीत जन्मला, मुस्लीम नाव आहे म्हणून त्याला मुस्लीम मराठी साहित्य म्हणणे योग्य ठरत नाही. या संदर्भात डॉ. गिरीश मोरे यांचे विचार महत्त्वाचे ठरतात, ते म्हणतात, "केवळ दलित जातीत जन्मलेल्या लेखकाने लिहिलेले साहित्य म्हणजेच दलित साहित्य असे म्हणता येत नाही. स्त्रीने लिहिलेले साहित्य म्हणून ते स्त्रीवादी साहित्य ठरत नाही. त्याप्रमाणे केवळ मुस्लीम लेखकाने लिहिलेले आहे म्हणून ते मुस्लीम साहित्य ठरत नाही. त्यासाठी 'जाणीव' हा शब्द फार महत्त्वाचा आहे. मुस्लीम जाणीवा व्यक्त करणारे साहित्य हेच मुस्लीम साहित्य ठरते"[२] मुस्लीम मराठी साहित्यात मुस्लीम मानसिकता, मुस्लीम जाणिवा येणे गरजेचे आहे. येथे मुस्लीम जाणिवा किंवा मानसिकता म्हणजे मुस्लीम धर्माचे चित्रण किंवा इस्लामचे चित्रण नव्हे. प्रा. फकरूद्दीन बेन्नुर मुस्लीम मराठी साहित्याची व्याख्या करताना म्हणतात, "मुस्लीम मराठी साहित्य याचा अर्थ आम्ही असा करतो की, मराठी मुसलमान लेखकांचे साहित्य आणि महत्त्वाचे म्हणजे 'मुसलमान' म्हणून व 'मराठी माणूस' म्हणून जगत असताना जे ताणतणाव निर्माण होतात ते व्यक्त करणारे आणि त्यामधील समताण शोधण्याचा प्रयत्न करणारे साहित्य होय. त्यात मुस्लीम म्हणून मराठी प्रदेशात जगत असताना आणि त्याचबरोबर धर्माने निर्माण केलेले मुस्लीमपण आणि इथल्या सामाजिक वास्तवातून परंपरेने चालत आलेले भारतीय समाजातील गुण विशेष या दोन्हींमुळे इथल्या संवेदनाक्षम लेखकांच्या मनात ज्या जाणिवा निर्माण होतात, जो संघर्ष उभा राहतो त्याचे चित्रण करणारे साहित्य म्हणजे मुस्लीम मराठी साहित्य होय"[३]

मुस्लीम म्हणून व मराठी माणूस म्हणून जीवन जगत असताना जे ताणतणाव निर्माण होतात त्याचे चित्रण मुस्लीम मराठी साहित्यात येणे गरजेचे आहे. प्रा. निशिकांत ठकार मुस्लीम मराठी साहित्या संदर्भात आपले विचार व्यक्त करताना म्हणतात, "वास्तवाला महत्त्व देणारे आणि मराठी परंपरेचा विचार करणारे साहित्य म्हणजे मुस्लीम मराठी साहित्य. मुस्लीम मराठी साहित्य म्हणजे विश्वास ज्यांच्या लेखनात मराठी असण्याबद्दलचा विश्वास आणि त्यांच्या साहित्यिक असण्याबद्दलचा विश्वास मिळेल त्याला मी मुस्लीम मराठी साहित्य म्हणेन"[४] मुस्लीम मराठी साहित्यातून मुस्लीम असण्याबद्दलचा विश्वास व्यक्त होणे गरजेचे आहे. मुस्लीम मराठी साहित्यामध्ये मुस्लीम मानसिकता, मुस्लीम जाणिवा, मुस्लीम असण्याचा आत्मविश्वास आलाच पाहिजे. जन्माने मुस्लीम असलेल्या किंवा कालांतराने मुस्लीम धर्म स्वीकारलेल्या मराठी भाषिक लेखकाने मुस्लीम मराठी समाज जीवनाचे चित्रण आपल्या मानसिकतेसह केलेले असेल तर त्याला मुस्लीम मराठी साहित्य म्हणावे.

मुस्लीम मराठी साहित्याच्या माध्यमातून अनेक साहित्यिकांनी लेखन केलेले आहे. कवितेचा विचार केल्यास प्रा. फ. म. शहाजिंदे, कवी खावर, ए. के. शेख, प्रा. अजीज नदाफ, मुबारक शेख, इलाही जमादार, खलील मोमीन, सय्यद अल्लाउद्दीन, जावेद पाशा, डी. के. शेख, इतबार पठाण, इब्राहिम खान, डॉ. नसीमा पठाण, फातिमा मुजावर, एहतेशाम देशमुख, शेख इक्बाल मिन्ने, मिर्झा रफी अहमद बेग, जहीर शेख, अमीन तांबोळी, शब्बीर मुलाणी, इक्बाल मुकादम, शफिक शेख, अजिज नवाज राही, शफी बोल्डेकर अशा असंख्य कविंनी काव्य लेखन केले आहे. मुस्लीम समाजातील रूढी, परंपरा, सामाजिक, धार्मिक, आर्थिक स्थिती, मुस्लीम समाजाकडे इतर समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन अशा विविध प्रश्नांवर या कविंची कविता भाष्य करते. मुस्लीम मराठी कवितेचे वैशिष्ट्या कथन करताना अक्रम पठाण म्हणतात, "मुस्लीम मराठी कवितेतूनही जीवनाविषयक अनुभव व्यक्त झालेले आहेत. समता, सामाजिक न्याय, उज्वल मानवी प्रतिष्ठा आणि बुध्दिप्रामाण्यवाद या मानवी मूल्यांची जोपासना मुस्लीम मराठी कवींच्या कवितेतून प्रामुख्याने जाणवते"[५] मानवी मूल्यांची जोपासना करणारी ही कविता नक्कीच उच्च कोटीची आहे यात शंका नाही.

मुस्लीम मराठी कथेचा विचार केल्यास हमीद दलवाई, यू. म. पठाण, बशीर मुजावर, राजन खान, एहतेशाम देशमुख, जावेद कुरेशी, मुबारक शेख, रफिक सूरज, सलीम जावीद मुल्ला, मुमताज रहिमतपुरे, तसनीम पटेल, खलील खान, बाबा मोहम्मद अतार, इतबार खान पठाण, मुहम्मद निसार पठाण अशा कथा लेखकांनी मुस्लीम मराठी कथेचे दालन समृध्द केले. मुस्लीम मराठी

कथाकारांच्या कथेचे वैशिष्ट्या स्पष्ट करताना रफिक सूरज म्हणतात, "मुस्लीम मराठी कथेतून मुस्लीम मानसिकतेचे व समाज जीवनाचे दर्शन उत्कटतेने झाले आहे. हळुहळू या कथेला आपला वेगळा आकार व अस्मिता प्राप्त होत आहे. मुस्लीम मराठी कथाकारांनी यापूर्वी मराठी साहित्यात कधीच न आलेले अनुभव विश्व मांडले आहे"[६] मराठी साहित्यात पूर्वी कधीच न आलेले अनुभव शब्दबध्द केले, त्यामुळे मराठी साहित्यात मोलाची भर पडत गेली.

मुस्लीम मराठी कादंबरीचा विचार करता, मुस्लीम मराठी कादंबरीकार म्हणून हमीद दलवाई 'इंधन', फ. म. शहाजिंदे 'मी तू', मोहम्मद अनवर खान 'श्रध्दा', राजन खान 'शरीयत', 'काफर', 'यतिम', 'सत ना गत', 'जातवत आणि विनशन', डॉ. शकील शेख 'जुबा', 'जंग', प्रा. रफिक सूरज 'रहबर', ए रझ्झाक 'रझिया सुलताना', जे. जे. शेख 'पहाट', अबु काझी 'अभिनेत्री', मोहम्मद नैसर्गी 'चक्र गुंतले चक्रात' अशा विविध कादंबरीकारांचा उल्लेख करता येईल. मुस्लीम मराठी कादंबरीकारांच्या कादंबरीचे विशेष कथन करताना अक्रम पठाण म्हणतात, "स्वातंत्र्योत्तर काळात हिंदू-मुस्लीमांच्या दंगली, सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक असे मूलभूत प्रश्न घेऊन मुस्लीम कादंबरीकाराने आपल्या कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत"[७] मुस्लीम समाजातील शिक्षणाचा प्रश्न, फाळणी, रजाकार चळवळ, बेकारी, दारिद्र्या, तलाक अशा विविध प्रश्नांवर मुस्लीम मराठी कादंबरीकार लेखन करताना दिसतात.

मुस्लीम मराठी आत्मचरित्राचा विचार केल्यास मुस्लीम मराठी आत्मचरित्रामध्ये फकिर महंमद जुवले यांचे 'माझ्या दर्यावर्दी जीवनाची भरती ओहोटी', शांतादेवी तडवी यांचे 'संधिप्रकाश', मलिका अमर शेख यांचे 'मला उद्‌धवस्त व्हायचंय', अजीज नदाफ यांचे 'जाग्या झालेल्या सावल्या', इब्राहिम खान यांचे 'मुस्लीम महार', हुसेन जमादार यांचे 'जिहाद', मेहरून्निसा दलवाई यांचे 'मी भरून पावले आहे', हुसेन दलवाई यांचे 'क्षितीजे अपार', खातुनबी मत्तीकाप यांचे 'खातुन', नसीमा हुरजुक यांचे 'चाकाची खूर्ची', अब्दुल गनी अतार यांचे 'कोकरूड ते बर्मिंग हॅम', आशा अपराध यांच 'भोगले जे दुःख त्याला...', सय्यदभाई यांचे 'दगडावरची पेरणी', लतीफ मगदूम यांचे 'मी एक कोणी तरी !', तसनीम पटेल यांचे 'भाळआभाळ' या आत्मचरित्रांचा उल्लेख करता येईल. मुस्लीम मराठी आत्मचरित्रांचे स्वरूप, कथन करताना डॉ. शकील शेख म्हणतात, "मुस्लीम मराठी आत्मचरित्रात आलेली विविधता आणि सूक्ष्मता हयातून मुस्लीम मराठी आत्मचरित्रांचे सामर्थ्य प्रकटते. या आत्मचरित्रांतून येणारे अनुभव अंतर्मुख करणारे आहेत. मुस्लीम मराठी आत्मचरित्रांना आत्मपरीक्षणाचे रूप आलेले दिसते"[८]

याशिवाय मुस्लीम मराठी नाटक, मुस्लीम मराठी वैचारिक लेखन, मुस्लीम मराठी समीक्षा अशा साहित्य प्रकाराचे कमी-अधिक प्रकारात लेखन झालेले दिसते.

एकंदरीत मुस्लीम मराठी साहित्य संकल्पना, उदय आणि विकासाचा विचार करता मुस्लीम मराठी साहित्य ही संकल्पना आज मराठी साहित्यात सर्व मान्य झाली आहे. या साहित्य प्रकारातून आज अधिकाधिक लेखन केले जात आहे.

### *संदर्भ ग्रंथ*

१.शहाजिंदे फ. म., 'मुस्लीम मराठी साहित्य', मराठी वाङ्‌मयातील नवीन प्रवाह (संपा. लिंबाळे शरणकुमार), मधुराज पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती, १९९३, पृ. १२५.
२.मोरे गिरीश, 'मुस्लीम मराठी साहित्य प्रवाहाचे सिध्दांतन', मुस्लीम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप (संपा. शहाजिंदे फ. म., तांबोळी फारूक), भूमी प्रकाशन लातूर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृ. १४६.
३.बेन्नुर फकरूद्‌दीन, 'चौथे अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण' 'विचार मंथन' (संपा. नदाफ अजिज), एकता प्रकाशन सोलापूर, प्रथम आवृत्ती, २००२, पृ. ३७.
४.ठकार निशिकांत, 'मुस्लीम मराठी साहित्य - एक आकलन', महेबुब सय्यद, सावित्रीबाई फुले प्रकाशन पुणे, आवृत्ती क्रमांक व प्रकाशन वर्ष दिलले नाही, पृ. ४० वरून उद्‌धृत.
५.पठाण अक्रम हबीबखान, 'मुस्लीम मराठी साहित्य', युगसाक्षी प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृ. ६८.
६.रफिक सूरज, 'मुस्लीम मराठी कथा, मुस्लीम मराठी साहित्य : परंपरा, स्वरूप आणि लेखक सूची', (संपा. शहाजिंदे फ. म.), भूमी प्रकाशन लातूर, प्रथम आवृत्ती, २००४, पृ. १९१.
७.पठाण अक्रम हबीबखान, उनि, पृ. २४१.
८.शेख शकील, 'मुस्लीम मराठी आत्मचरित्रे : एक चिकित्सक अभ्यास', अक्षरलेणं प्रकाशन सोलापूर, प्रथम आवृत्ती, २०१४, पृ. ५६.



*प्रा. डॉ. शकील शेख*
*प्रमुख, मराठी विभाग, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग,*
*ता. बार्शी, जि. सोलापूर,*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing



Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org